**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
**Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2021: 7.278, www.srjis.com**
PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, AUG-SEPT, 2021, VOL-9/47

# औरंगाबाद शहरातील माध्यमिक स्तरातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर कोविड १९ मुळे होणाऱ्या परिणामांचा अभ्यास

**शारदा नागनाथ शेळके[1] & एस. एस. पाठक[2], Ph. D.**

*[1]संशोधक, शिक्षणशास्त्र विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद*

*Gmail - snmhaske15@gmail.com*

*[2]मार्गदर्शक, सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. Gmail-sspathak2010@gmail.com*

**Paper Received On:** 25 SEPT 2021
**Peer Reviewed On:** 30 SEPT 2021
**Published On:** 1 OCT 2021

**Abstract**

*औरंगाबाद जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर covid-19 मुळे झालेल्या परिणामांचा अभ्यास केला यामध्ये विद्यार्थ्यांच्या विद्यार्थ्यांच्या ज्ञान आकलन उपयोजन कौशल्य व मनोवृत्ती यावर covid-19 कसा परिणाम झाला यावर संशोधन केले मुलांना काय समस्या याचा शोध घेता आला.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**• प्रास्तविक**

माध्यमिक शिक्षण म्हणजे विद्यार्थ्याच्या भवितव्याची पायाभरणी होय. विकासाच्या दृष्टीने माध्यमिक शिक्षणाला महत्वाचे स्थान आहे. सुरवातीच्या काळात आई, वडील हे बालकाचे गुरु आहे. परंतु आजच्या आधुनिक युगात आई वडील यांना दोघांनाही उपजीवीका करण्यासाठी घराबाहेर जावे लागते. शिक्षण म्हणजे ज्ञान कौशल्य व अभिवृध्दी यांचे संपान असल्याने तत्ववेत्यांनी शिक्षणविषयक सिध्दांत मांडण्याचे प्रयत्न केले.

शिक्षणाच्या नवनविन व्याख्या उदयास आल्या सर्वांग सुंदर जीवन जगण्याची तयारी म्हणजे शिक्षण शिक्षण म्हणजे सर्व मानवी प्राण्यांना आपआपल्या गरजा तृप्त करण्याचे सामर्थ्य देणारे, कल्याणाची हमी देणारे हक्काची जाणीव करून देऊन ती पार पाडण्याची क्षमता निर्माण करणारे साधन.आताच्या परिस्थितीत म्हणजे कोविड १९च्या पार्श्वभुमीवर शिक्षण क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणात परिणाम झाल्याचे आपणांस दिसून येते.

कोविड- १९ ही महामारी सर्वत्र वाढत असल्याने कोविड १९ चा परिणाम सर्व घटकावर झाल्याचे आहेच पण शैक्षणिक क्षेत्रावर याचा सर्वात मोठा परिणाम झाल्याचे आपणांस दिसून येते. या सर्व गोष्टींचा व शैक्षणिक क्षेत्राचा

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

विचार करुन संशोधकाने, "औरंगाबाद शहरातील माध्यमिक स्तरामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर कोविड १९ चा होणाऱ्या परिणामांचा अभ्यास" ही संशोधन समस्या निवडली आहे.

**• संशोधनाची गरज**

माध्यमिक शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या वाटचालीचा एक केंद्रबिंदू आणि ह्यामध्ये कोविड- १९ मुळे शिक्षणात आलेल्या अडचणी कोणत्या विद्यार्थ्याचे नुकसान कीती आणि मग ह्या सर्वाचा शिक्षणावर झालेला परिणाम व या बाबतीत पालकांची झालेली अवस्था, संभ्रम चिंता व यातुन निघालेला मार्ग या विषयीची माहिती मिळवण्यासाठी या विषयावर संशोधन होणे महत्वाचे आहे.

**• संशोधन समस्येचे महत्व**

आजच्या परिस्थितीचा विचार केला तर शैक्षणिक क्षेत्रावर कोविड १९ चा जास्तीत जास्त परिणाम झालेला आपणांस दिसून येतो. माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना भवितव्याची वाटचाल म्हणून ९ वी १० वी वर्ग महत्वाचे असतात. या काळात विद्यार्थ्यांना शिक्षण फार महत्वाचे असते. आणि शिक्षणाच्या या उंबरठ्यावर असतांना कोविड- १९ ची महामारी येते आणि शिक्षणावर त्याचा मोठा प्रभाव पडतो.

कोविड- १९ मुळे काय काय परिणाम झाले व त्यातुन काय काय उपाययोजना निघाल्या याचा आपण यामध्ये अभ्यास करणार आहोत. विद्यार्थी केव्हा शाळेत जातील, अभ्यासक्रम कसा पूर्ण होईल आणि हे विद्यार्थी येणाऱ्या परिक्षेला कसे सामोरे जातील. कोणती साधने वापरली यासाठी हे संशोधन महत्वाचे आहे.

**• समस्या विधान**

" औरंगाबाद शहरातील माध्यमिक स्तरावरील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर कोविड १९ मुळे होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे"

**• संशोधन समस्यांची गृहीतके**

१. माध्यमिक शिक्षण भविष्याच्या वाटचालीची पायाभरणी आहे २. माध्यमिक शिक्षणासाठी कोविड- १९ नंतर वापरली जाणारी साधने

2. विद्यार्थ्यांना भिती वाटते.

3. पालकांमध्ये संभ्रम आहे.

4. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास खालावलेला आहे.

5. अभ्यासक्रमात शासनाने कपात केलेली आहे

**• संशोधन समस्येची उद्दिष्ट्ये**

१. औरंगाबाद शहरातील माध्यमिक स्तरावर शिक्षण घेणारे विद्यार्थी माहिती मिळविणे.

२. कोविड- १९ नंतर शालेय परिस्थितीवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे. ३. माध्यमिक शिक्षणासाठी शिक्षण मंत्र्यांनी केलेल्या उपाय योजनांचा अभ्यास करणे.

3. माध्यमिक स्तरातील विद्यार्थी परिक्षेस कसे सामोरे जातील याचा अभ्यास करणे.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

4. कोव्हीड १९ मुळे निर्माण झालेल्या शैक्षणिक समस्या सुटण्यास उपाय सुचविणे.

**• संशोधन समस्येच्या परिकल्पना**

1 .कोविड- १९ जे परिणाम झाले ते पालकांवर व विद्यार्थ्यांवर जास्त झाले

2.कोविड- १९ मुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास खचला असावा.

3 .कोविड- १९ च्या परिणामामुळे परीक्षेचे वेळापत्रक बदलले .

4 .कोविड- १९ मुळे सर्वत्र शिक्षण पोहोचले नाही.

**• संशोधनाचा न्यादर्श**

औरंगाबाद शहरातील माध्यमिक स्तरावरील शिक्षण घेणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांपैकी व त्यांच्या पालकांपैकी एक प्रतिनिधिक स्वरुपात १०% नमुना निवड करण्यात आली आहे.

**• प्रमुख निष्कर्ष**

१. कोविड- १९ हा एक व्हायरस आहे आणि याचा शिक्षणावर परीक्षा पुढे ढकलणे, ऑनलाईन अभ्यास न समजणे असा परिणाम झालेला आहे.

2.शिक्षणासाठी ऑनलाइन साधनांचा मोठ्या प्रमाणात वापर दिसून आला.

३. कोविड- १९ ऑनलाईन शिक्षण घ्यावे लागले आहे आणि ऑनलाइन शिक्षणामध्ये सर्वच मुले उपस्थित नसतात.

४. ग्रामीण भागातील मुले, कष्टकरी जनतेची मुले यांच्यापर्यंत हे शिक्षण पोहोचत नाही.

५.कोविड- १९ मुळे पालकांना ही पद्धत खर्चिक वाटत आहे.

६.ऑनलाईन शिक्षण पद्धतीमुळे मुलांचे अक्षरांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात फरक पडलेला दिसून येतो तसेच मुलांची एकाग्रता कमी झालेली दिसून येते.

७ .मुलांची शिक्षणामध्ये एकाग्रता राहिली नाही.

८. मुलांचा मोबाईलचा वापर मोठ्या प्रमाणात वाढलेला दिसून येतो.

९.हेडफोन वापरल्यामुळे मुलांच्या आरोग्याच्या समस्या वाढल्या आहेत.

१०. निरक्षर पालकांना मुले अभ्यास करतात का मोबाइल खेळतात हे समजण्यास अडचण येते...

## संदर्भ सूची

*दैनिक वृत्तपत्र- दिव्य मराठी, लोकमत*
*टी.व्ही. न्युज- आजतक, ९ महाराष्ट्र, झी न्युज*
*यु टयूब*
*गुगल - स्क्रिन टाईम*
*डिजिटल शिक्षण आणि विद्या*
*कोरोना विषाणू आणि शिक्षण*
*प्रा. शरद जावडेकर*
*(महासंचालक युनेस्को)*
*(२८ मार्च २०२०)*
*ORF 5 May 2020*
*ऑनलाईन शिक्षण सर्वांना कसे परवडणार*
*Onling-orgcdn.ampproject.org*
*ई-सकाळ*
*Asianet news Hindi*
*जागरण*

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*